ISSN 2319 - 8508
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
HALF YEARLY RESEARCH JOURNAL

# GALAXY LINK

Volume - X Issue - I November - April - 2021-22

English / Marathi Part - I

**Peer Reviewed Refereed and UGC Listed Journal Journal No. 47023**

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

**IMPACT FACTOR / INDEXING 2019 - 6.571 www.sjifactor.com**

❖ EDITOR ❖

**Assit. Prof. Vinay Shankarrao Hatole**

M.Sc (Math's), M.B.A. (Mkt), M.B.A (H.R), M.Drama (Acting), M.Drama (Prod & Dirt), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

**Ajanta Prakashan**

Aurangabad. (M.S.)

The information and views expressed and the research content published in this journal, the sole responsibility lies entirely with the author(s) and does not reflect the official opinion of the Editorial Board, Advisory Committee and the Editor in Chief of the Journal **“GALAXY LINK”**. Owner, printer & publisher Vinay S. Hatole has printed this journal at Ajanta Computer and Printers, Jaisingpura, University Gate, Aurangabad, also Published the same at Aurangabad.

**Printed by**

Ajanta Computer, Near University Gate, Jaisingpura, Aurangabad. (M.S.)

**Printed by**

Ajanta Computer, Near University Gate, Jaisingpura, Aurangabad. (M.S.)

Cell No. : 9579260877, 9822620877 Ph. No. : (0240) 2400877

E-mail : ajanta5050@gmail.com, www.ajantaprakashan.com

**GALAXY LINK - ISSN 2319 - 8508 - Impact Factor - 6.571 (www.sjifactor.com)**

# EDITORIAL BOARD


**Anukrati Sharma**
Assot. Prof. Management,
University of Kota, Kota.

**Muhammad Mezbah-ul-Islam**
Ph.D. (NEHU, India) Assot. Prof. Dept. of
Information Science and Library Management
University of Dhaka, Dhaka - 1000, Bangladesh.

**Dr. Meenu Maheshwari**
Assit. Prof. & Former Head Dept. of Commerce
& Management University of Kota, Kota.

**Dr. S. Sampath**
Prof. of Statistics University of Madras
Chennari 600005.

**Dr. Avhad Suhas Dhondiba**
Assot. Prof. in Economics, Sahakar Maharshi
Bhausaheb Satntuji Thorat College of Arts,
Science & Commerce, Sangamner (M.S.)

**Dr. D. H. Malini Srinivasa Rao**
M.B.A., Ph.D., FDP (IIMA)
Assit. Prof. Dept. of Management
Pondicherry University, Karaikal - 609605.

**Dr. Kishore Kumar C. K.**
Coordinator Dept. of P. G. Studies and Research in
Physical Education and Deputy Director of
Physical Education, Mangalore University.

**Prof. U. B. Mohapatra**
Ph.D. (Nottingham, UK) Director,
Biotechnology Government of Odisha, Odisha
Secretariat Bhubaneswar - 751001, Odisha, India.

**Dr. Bibhuti P. Barik**
P. G. Dept. of Bioinformatics, North Orissa
University Shriramchandra Vihar, Takatpur,
Baripada, Odisha, India, Pin 757003.

**Dr. Vijaykumar Laxmikantrao Dharurkar**
Prof. and Head of Mass Communication and
Journalism, Dr. Babasaheb Ambedkar Marathwada
University, Aurangabad - 431004 (M.S.)

**Jatindra K. Sahu**
Ph.D. Assot. Prof. Dept. of Agriculture Engineering
School of Technology Assam University (A Central
University Silchar - 788011] Assam, India.

**Prof. S. D. S. Murthy**
F.N.E.A., Head, Dept. of Biochemistry,
S. V. University Tirupati - 2,
Andhra Pradesh, India.

**Dr. Madhukar Kisano Tajne**
Dept. of Psychology,
Deogiri College, Aurangabad.



**PUBLISHED BY**

**Ajanta Prakashan**
Aurangabad. (M.S.)

# CONTENTS OF ENGLISH PART - I


| S. No. | Title & Author | Page No. |
|---|---|---|
| 1 | Social Empowerment of Women<br>**Dr. Sauli Mitra** | 1-7 |
| 2 | Sustainable Development, Agenda 2030 & Environment Technology<br>**Dr. M. S. Bisen** | 8-13 |
| 3 | An Influence of E-Learning, as a Component of Digitalization on Learners and the Teaching Profession<br>**Dr. Sarika Sagar**<br>**Dr. Minal Paranjape** | 14-24 |
| 4 | A Study of Nature and Scope of History<br>**Sainath Manohar Gaikwad** | 25-29 |
| 5 | A Study: Causes of Poverty in India<br>**Mr. Kmalkishor S. Tode** | 30-35 |
| 6 | Physical Fitness between Teaching and Non-teaching Staff: A Comparative Study<br>**Dr. Jagdhish Prabhuling Zadhuke**<br>**Smt. Manisha Shankar Shinde** | 36-40 |

# CONTENTS OF MARATHI PART - I


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | कांशीरामजी आणि बहुजन समाज पक्षाची यशस्वी वाटचाल याचा संशोधनात्मक अभ्यास<br>**श्रीमती. जयश्री सोनकवडे** | १-८ |
| २ | संत शेख महंमद महाराज आणि त्यांची वंशपरंपरा<br>**डॉ. नवनाथ दत्तात्रय वाजगे** | ९-१२ |
| ३ | लोकमान्य टिळकांचा समकालीन मराठी साहित्यावरील प्रभाव<br>**डॉ. संजयकुमार कोळी** | १३-१७ |
| ४ | महाराष्ट्रातील स्वायत्त महाविद्यालयांतील विद्यार्थी, प्राध्यापक, विभागप्रमुख व प्राचार्य यांना होणाऱ्या फायद्यांचा अभ्यास<br>**डॉ. पाठक सुहास सखाराम**<br>**झाकडे अर्चना प्रल्हाद** | १८-२० |

# ४. महाराष्ट्रातील स्वायत्त महाविद्यालयांतील विद्यार्थी, प्राध्यापक, विभागप्रमुख व प्राचार्य यांना होणाऱ्या फायद्यांचा अभ्यास

**डॉ. पाठक सुहास सखाराम**
शिक्षणशास्त्र विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.
**झाकडे अर्चना प्रल्हाद**
शिक्षणशास्त्र विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

महाराष्ट्रातील स्वायत्त महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक, विभागप्रमुख व प्राचार्य यांना होणाऱ्या फायद्यांचा अभ्यास यात करण्यात आलेला आहे. प्रस्तुत संशोधनासाठी १५ स्वायत्त महाविद्यालये घेतली होती. तसेच प्रस्तुत संशोधनासाठी सर्वेक्षण संशोधन पद्धती निवडली होती. त्याचबरोबर विद्यार्थ्यांसाठी प्रश्नावली, प्राध्यापकांसाठी प्रश्नावली, विभागप्रमुखांसाठी प्रश्नावली, प्राचार्यांसाठी मुलाखत या स्वनिर्मित साधनांचा वापर करण्यात आला होता.

स्वायत्त महाविद्यालयांनी विविध उपक्रम राबवावे, अधिकाधिक बदल कमी वेळेत करुन शिक्षणाची गुणवत्ता वाढवावी अशा अपेक्षा असते. या अपेक्षेला बहुतांश स्वायत्त महाविद्यालय पात्र ठरत आहेत. महाराष्ट्रातील स्वायत्त महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक, विभागप्रमुख आणि प्राचार्य यांना विविध फायदे होत आहेत. विशेष म्हणजे त्यांना स्वतःच्या विकासासाठी पुरेशी संधी उपलब्ध करुन देण्याबरोबरच स्वातंत्र्यही दिले जाते. परिक्षेत पास होणे हे उदिष्ट मागे पडून व्यक्तीमत्वाचा संपूर्ण विकास याचा विचार केला जात आहे. तसेच अनेकविध कौशल्य विकसित करण्याचाही प्रयत्न होताना दिसत आहे.

**गरजः** उच्च शिक्षणाची गुणवत्ता सुधारण्यासाठी केलेला स्वायत्ततेचा प्रयोग शैक्षणिकदृष्ट्या कितपत योग्य आहे? हे पडताळण्याची गरज आहे.

**उपयोगिताः** स्वायत्त महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक, विभागप्रमुख व प्राचार्य यांच्यासाठी करण्यात येणारे प्रयत्न समजून घेण्यासाठी उपयोगी आहे. तसेच स्वायत्ततेचे फायदे समजून घेण्यासाठी उपयुक्त आहे.

**उद्दिष्टः** **१.** महाराष्ट्रातील स्वायत्त महाविद्यालयातील विद्यार्थी, प्रध्यापक, विभागप्रमुख व प्राचार्य यांना होणाऱ्या फायद्यांचा अभ्यास करणे.

**परिकल्पनाः** **१.** महाराष्ट्रातील स्वायत्त महाविद्यालयास शैक्षणिक स्वातंत्र्य असावे.

**२.** महाराष्ट्रातील स्वायत्त महाविद्यालयाच्या स्वायत्ततेमुळे विद्यार्थी, प्रध्यापक, विभागप्रमुख व प्राचार्य यांना विविध फायदे होत असावेत.

**संशोधन पद्धतीः** प्रस्तुत संशोधनाच्या अभ्यासासाठी सर्वेक्षण संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आला होता.

**नमुना निवडः** प्रस्तुत संशोधनामध्ये महाराष्ट्रातील १५ स्वायत्त महाविद्यालयांचा अभ्यास करण्यात आलेला आहे.

**संशोधन साधनेः** प्रस्तुत संशोधनाच्या माहिती संकलनाकरीता महाराष्ट्रातील स्वायत्त महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी प्रश्नावली, प्राध्यापकांसाठी प्रश्नावली, विभागप्रमुखांसाठी प्रश्नावली, प्राचार्यांसाठी मुलाखत या स्वनिर्मित संशोधन साधनांचा वापर करण्यात आला होता.

**राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर संधी प्राप्त होण्याबाबत**

| अ.क्र. | प्रतिसाद | विद्यार्थी प्रतिसादक संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | स्पर्धेद्वारे | २७ | १८.००% |
| २. | कार्यक्रमाद्वारे | ०९ | ०६.००% |
| ३. | उपक्रमाद्वारे | १८ | १२.००% |
| ४. | क्षेत्रभेट / आंतरवासिता/ प्रशिक्षण/ स्पर्धा | ६४ | ४२.६६% |
| ५. | प्रकल्प/ संशोधन/गटकार्य | ३२ | २१.३३% |
| | **एकूण** | **१५०** | **१००%** |

**निष्कर्ष**

१. सर्वच विद्यार्थ्यांच्या मते, स्वायत्त महाविद्यालयात शासनाची शिष्यवृत्ती व शासनाचे आरक्षित धोरण राबविले जाते.

२. ५६.६६ टक्के विद्यार्थ्यांच्या मते, स्वायत्त महाविद्यालयातील अभ्यासक्रम उद्योगप्रधान, रोजगारप्राप्त व आकलनक्षम आहे.

३. ८३.३३ टक्के विद्यार्थी प्राध्यापकांच्या अध्यापनाबाबत समाधानी आहेत.

४. ४० टक्के विद्यार्थ्यांच्या मते, विद्यार्थ्यांच्या मुल्यमापनासाठी सेमेस्टर आणि सातत्यपूर्ण व सर्वंकष मूल्यमपन पद्धतीचा वापर केला जातो.

५. ४६ टक्के विद्यार्थ्यांच्या मते, स्वायत्त महाविद्यालयात घेतल्या जाणाऱ्या परीक्षेचा निकाल एक महिन्याच्या आत लागतो.

६. २८ टक्के विद्यार्थ्यांच्या मते, कौशल्याधिष्ठित शिक्षण, परिपूर्ण तयारी, अनेकविध कौशल्य विकसित, तज्ज्ञांचे अनमोल मार्गदर्शन, नोकरी व व्यवसायांच्या व्यापक संधी, व्यक्तीमत्वाचा विकास, कलागुणांचा विकास असे विविध फायदे महाविद्यालयाच्या स्वायत्ततेमुळे होतात.

७. ८० टक्के विद्यार्थ्यांच्या मते, स्वायत्त महाविद्यालयात विद्यार्थी व शिक्षकांना पुरेसे स्वातंत्र्य दिले जाते.

८. ४२.६६ टक्के विद्यार्थ्यांच्या मते, क्षेत्रभेट, आंतरवासिता, प्रशिक्षण व स्पर्धेद्वारे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर संधी प्राप्त होते.

९. ४० टक्के प्राध्यापकांच्या मते, स्वायत्त महाविद्यालयातील अभ्यासक्रम आवश्यकतेनुसार अद्ययावत केला जातो.

१०. ३६ टक्के प्राध्यापकांनी स्वायत्त महाविद्यालयात पॉवरपॉइंट प्रझेंटेशन, ऑडिओ - व्हिडिओ, प्रकल्प या अध्यापन पद्धती विकसित केल्या आहेत.

११. ३७.३३ टक्के प्राध्यापकांच्या विकासासाठी विविध उपक्रमांचे आयोजन केले जाते.

१२. सर्वच प्राध्यापक स्वतः अध्यापन करावयाच्य विषयाची शैक्षणिक दिनदर्शिका स्वतःच तयार करतात.

१३. ५६ टक्के प्राध्यापकांच्या मते, ५६ टक्के प्राध्यापकांच्या मते, स्वायत्त महाविद्यालयात निवडाधारित श्रेणी पद्धती आहे.

१४. ५३.३३ टक्के प्राध्यापकांच्या मते, वर्गातील विद्यार्थ्यांची उपस्थिती शंभर टक्के असते.

१५. ३७.३३ टक्के प्राध्यापकांच्या मते, त्यांच्या विकासासाठी प्रशिक्षण, कार्यशाळा,,परीषद, चर्चासत्र, प्राध्यापक विकास कार्यक्रम, उद्‌बोधन व प्रबोधन वर्ग, प्रकल्प अशा उपक्रमांचे आयोजन केले जाते.

१६. ३४.६६ टक्के प्राध्यापकांच्या मते, संशोधन प्रकल्प, सर्जनशीलता व कल्पनाशक्तीचा विकास, अद्ययावतपणा, कार्यक्षमतेचा विकास, प्रेरणादायी वातावरण हे फायदे महाविद्यालयाच्या स्वायत्ततेमुळे होतात.

१७. ५६.६६ टक्के विभागप्रमुखांच्या मते, विद्यार्थी व प्राध्यापकांच्या कामगिरीत सुधारणा, त्वरीत निर्णय, अभ्यासक्रमास मागणी वाढली, विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास, विद्यार्थ्यांच्या रोजगार टक्केवारीत वाढ असे फायदे स्वायत्ततेमुळे होतात.

१८. ६६.६६ टक्के प्राचार्यांच्या मते, स्वायत्त महाविद्यालयात नविन पूर्णवेळ अभ्यासक्रम सुरु केले आहेत.

१९. ६० टक्के प्राचार्यांच्या मते, नविन पूर्णवेळ अभ्यासक्रम सुरु करताना समस्या येत नाहीत.

२०. सर्वच प्राचार्यांच्या मते, स्वायत्त महाविद्यालयातील अभ्यासक्रम अद्ययावत करताना कोणाच्याही परवानगीची गरज नसते.

२१. सर्वच प्राचार्यांच्या मते, स्वायत्त महाविद्यालयात उपलब्ध शाखा आणि उपशाखांचे आंतरवासिता कोर्स सुरु करण्याचे स्वातंत्र्य आहे.

२२. ६६.६६ टक्के प्राचार्यांच्या मते, शैक्षणिक स्वातंत्र्य, कौशल्याधिष्ठित अभ्यासक्रम व कोर्स, विद्यार्थी व प्राध्यापकांच्या कामगिरीत वाढ, विद्यार्थी व प्राध्यापकांना अनेकविध संधी आणि विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास हे फायदे स्वायत्ततेमुळे होत आहेत.

**संदर्भग्रंथ**

१. भोगटे, श्री. ब. (२०११). मराठवाड्यातील शिक्षण एकविसाव्या शतकातील आव्हाने, औरंगाबादः स्वामी रामानंद तीर्थ संशोधन संस्था.

२. बर्वे, बी. एन. (२००७). शैक्षणिक मानसशास्त्रीय संख्याशास्त्र, नागपूरः विद्या प्रकाशन.

३. देव, ने. आणि कुलकर्णी, अ. (२०१३). शैक्षणिक संशोधन, पुणेः नित्यनूतन प्रकाशन.

४. कुंभार, वि. मा. (२०१८). स्वायत्त महाविद्यालयः एक आव्हान, ISBN: 978-93-5300-657-0

५. पंडित, ब. बि., पाटील, न. आणि मोरे, ल. सू. (२००९). शिक्षकशिक्षण, नागपूरः पिंपळापूरे अँड कं. पब्लिशर्स.

६. पंडित, ब. बि. (२००८). शिक्षणातील संशोधन, पुणेः नित्यनूतन प्रकाशन.

७. George, A. (2011). College Autonomy in India: Performance and Prospects, New Delhi: Authorspress Publishers of Scolarly Book.

८. https://www.ugc.ac.in.